आधुनिक विचारांचे


# वर्तमान






बीड । मंगळवार, २९ जून २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ३६ । पाने : ४ । मूल्य २ ₹



## दुर्गराज रायगडाचे तेज...

किल्ले रायगड : शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या सौजन्याने नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात आली. या विद्युत रोषणाईमुळे किल्ल्याचा परिसर तेजाने उजळून निघाला. या सुवर्णक्षणाची छायाचित्रे खास वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.


बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड


# तुकाराम येवले की अशोक आळणे?

## शिवसेना माजलगाव तालुकाप्रमुख पदासाठी रस्सीखेच

प्रतिनिधी

माजलगाव : शिवसेनेचे माजलगाव तालुकाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांची बीड जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती झाल्याने त्यांच्या जागी कोणाची वर्णी लागते. याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागलेले आहे. दरम्यान, शिवसेनेचे माजी उपनगराध्यक्ष तुकाराम येवले आणि विद्यमान नगरसेवक अशोक आळणे यांच्यात तालुकाप्रमुख पदासाठी रस्सीखेच सुरू आहे. मात्र प्राप्त परिस्थितीत तुकाराम येवले यांच्याच गळ्यात तालुकाप्रमुख पदाची माळ पडेल, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

बीड जिल्ह्यात राजकीयदृष्ट्या संवेदनशील तालुका म्हणून माजलगावची ओळख आहे. सिंचनक्षेत्र अधिक असल्याने हा तालुका जिल्ह्यात सधन मानला जातो. या तालुक्याने अनेक राजकीय दिग्गज घडविले आहेत. माजलगाव शिवसेना तालुकाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांच्या कार्याची चुणूक लक्षात घेवून त्यांना जिल्हाप्रमुख पदाची पक्षाने संधी दिली. त्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या तालुकाप्रमुखपदी कोणाची वर्णी लागते.





याबाबत तर्कवितर्क काढले जात असले तरी प्राप्त परिस्थितीत शिवसेनेचे माजी उपनगराध्यक्ष तथा ज्येष्ठ तुकाराम येवले यांच्या नावाला अधिक पसंती दिली जात असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. तुकाराम येवले यांनी आजपर्यंत पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिलेले आहे. शिवसेनेचे उपनगराध्यक्ष म्हणून त्यांचा कार्यकाळ अतिशय प्रभावी ठरलेला आहे. विविध आंदोलनातून पुढे आलेले नेतृत्व म्हणून तुकाराम येवले यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे पक्ष बळकट करण्यासाठी तुकाराम येवले हेच प्रबळ दावेदार असून बहुजन समाजातील शिवसैनिकाला माजलगाव तालुकाप्रमुखपदी काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी जोर धरत आहे. तुकाराम येवले यांच्याबरोबरच शिवसेनेचे विद्यमान नगरसेवक अशोक आळणे यांचेही नाव तालुकाप्रमुख पदासाठी चर्चेत आहे. येवले आणि आळणे यांच्यातच या पदासाठी चुरस निर्माण झाली असून या दोघांपैकी एकाला संधी मिळेल असे शिवसेनेच्या गोटातून बोलले जात आहे. दरम्यान, नवनियुक्त जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव काय भूमिका घेतात. याकडेही तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आगामी नगर परिषद निवडणूक, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक, बाजार समिती निवडणूक डोळ्यासमोर ठेवून माजलगाव तालुकाप्रमुख पदाला महत्त्व निर्माण झाले आहे. माजलगाव तालुक्यात शिवसेनेचे व्यापक संघटन वाढविण्यासाठी ग्रामीण भागातील तळागाळापर्यंत ओळख असलेले नेतृत्व पक्षाने द्यावे अशाही प्रतिक्रिया ज्येष्ठ शिवसैनिकांनी वर्तमानकडे दिल्या आहेत. अशोक आळणे यांच्यापेक्षा तुकाराम येवले यांचे पारडे जड असल्याचे बोलले जात आहे.

### तुकाराम येवले यांचा परिचय

अगदी विद्यार्थी दशेपासून एसएफआयच्या माध्यमातून तुकाराम येवले हे पुढे आलेले नेतृत्व आहे. मूळ गाव ब्रम्हगाव येथील रहिवाशी असलेले येवले अतिशय गरीब कुटुंबातून आलेले आहेत. त्यांचे वडील हमाली करत होते. त्यांचे शिक्षण त्यांच्या मावशीने शेवता (जि.जालना) येथे केले. सन १९९३ पासून ते आजतागायत दैनिक पार्श्वभूमीचे माजलगाव तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. १९९६ साली माजलगाव नगर परिषदसाठी अपक्ष निवडणूक लढविली आणि ते जिंकूनही आले. २००६ साली येवले भाजपाकडून निवडणूक लढवून दुसऱ्यांदा नगरसेवक झाले. तिसऱ्यांदा त्यांना शिवसेनेकडून उमेदवारी मिळाली आणि निवडणूक जिंकली. याच कार्यकाळात अडीच वर्षे त्यांनी उपनगराध्यक्ष पद भूषविले. अतिशय प्रभावीपणे त्यांनी उपनगराध्यक्ष म्हणून काम पाहिले. राजकारणाबरोबरच समाजकारणातही सक्रिय असलेल्या येवले यांनी विविध आंदोलने केली आहेत. त्यात नगरपरिषदेवर काढलेल्या घागर मोर्चाचा उल्लेख करावा लागेल.

### संजय शिंदेही इच्छुक



शिवसेना माजलगाव तालुकाप्रमुख पदासाठी अनेक जण इच्छुक असले तरी पक्ष सक्षम नेतृत्वाकडे संधी देईल अशी शक्यता बळावलेली आहे. तुकाराम येवले, अशोक आळणे हे प्रमुख दावेदार मानले जात असले तरी दिंद्रुड परिसरातील शिवसैनिक संजय शिंदे हेही या पदासाठी इच्छुक असल्याचे बोलले जात आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### जिल्हाधिकारी रविंद्र जगताप दीर्घ रजेवर



बीड : महसूल विभागामध्ये उपजिल्हाधिकारी, तहसिलदार (महसूल) यांचे अनेक पदे रिक्त आहेत. एका-एका उपजिल्हाधिकाऱ्याकडे तीन-तीन विभागांचा पदभार रिक्त असतानाही जिल्हाधिकारी रविंद्र जगताप हे ४ जुलैपासून दीर्घ मुदतीच्या रजेवर जात आहेत. जिल्हाधिकारी जगताप यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये आरोग्य प्रशासन ढेपाळलेले होते. त्यातच राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी खरीप हंगाम संदर्भातील बैठकीत सर्व शासकीय अधिकाऱ्यांसमोर जिल्हाधिकाऱ्यांचे वाभाडे काढले होते. यातच जिल्हाधिकारी रविंद्र जगताप खाजगी कारण देत तब्बल महिनाभराच्या रजेवर जात असल्याने पुन्हा एकदा जिल्ह्याचा सर्वच कारभार प्रभारी अधिकाऱ्यावर येऊन ठेपणार आहे.

### राखेच्या प्रदूषणाने परळीकर हैराण

परळी : हायवा टिप्पर गाड्यातील राख रस्त्यावर पडून प्रदूषण होत असल्याने शहरासह आजूबाजूच्या खेड्यातील ग्रामस्थ हैराण झाले आहेत. शुक्रवारी सकाळी राखेच्या प्रदूषणामुळे संतप्त झालेल्या पांगरी कॅम्प येथील महिलांनी राखेच्या गाड्या अडवून वाहनचालकांना चांगलाच चोप दिला. यानंतर वाहनचालकांना चक्क रस्ता साफ करायला लावला. आक्रमक झालेल्या महिला पाहून गाडीतून उतरून वाहनचालकांनी राखेचे ढीग उचलून रस्ता स्वच्छ केला तेव्हाच त्यांच्या गाड्या तेथून पुढे जाऊ शकल्या. परळी तालुक्यात दररोज २०० हायवा गाडी राख भरून विक्रीसाठी व्यवसायिक घेवून जातात. राखेची वाहतूक परळीच्या चार ही दिशेने होत असल्याने सर्वच भागातील नागरिक राख प्रदूषणाला कंटाळले आहेत. या प्रश्नी ऊर्जामंत्री, मुख्य अभियंत्यांना निवेदन दिले, चर्चा केली. काही दिवसांपूर्वी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी राख वाहतूक बंद करण्याचे आदेश दिले. तरीही राखे वाहतूक बंद होण्याऐवजी जोरात सुरू आहे.

### 'धारूर घाट रस्त्याचे रुंदीकरण करा'

धारूर : घाटामध्ये रस्ता अरूंद असल्यामुळे अपघाताची मालिका दररोज सुरूच आहे. रस्ता रुंदीकरण करावे या मागणीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाचे अध्यक्ष डॉ.जितेंद्र ओव्हाळ, तालुकाध्यक्ष सनी गायसमुद्रे यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. गेल्या कित्येक वर्षापासून धारूर घाटातील रस्ता अरूंद आहे. यामुळे दररोज अपघात होऊन अनेक लोक मृत्युमुखी पडले आहेत. तरी देखील लोकप्रतिनिधी व प्रशासन केवळ गुत्तेदार पोसण्याचे काम करत आहे. रस्ता रुंदीकरण करण्याची अनेक वर्षाच्या नागरिकांच्या मागणीकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींचे साफ दुर्लक्ष होत असल्याने सोमवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विकास मंचच्या वतीने आंदोलन करण्यात आले.










## संपादकीय

# सामाजिक न्याय म्हणजे काय?

महाराष्ट्र सरकार लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी सामाजिक न्याय दिन साजरा करत आहे. हे परिवर्तनीय पाऊल आहे. राज्य शासनाकडून २६ जून हा दिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून जाहीर झालेला आहे. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचा हा जन्म दिवस. सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी त्यांचे कार्य खूप महत्त्वाचे आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्क. स्त्री-पुरुष समानता, समाजातील सर्वच थरातील व्यक्तींना विकासाची, शिक्षणाची संधी, ही सामाजिक न्यायाची उद्दिष्टे आहेत. सामाजिक न्याय म्हणजे काय? तर प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमतेप्रमाणे विकासाच्या संधी देणे, अथवा मिळवून देणे. कोणाचेही शोषण होणार नाही. किमान प्राथमिक गरजा पूर्ण होतील हे बघणे. आर्थिक सत्ता केंद्रित होणार नाही, ही दक्षता घेणे. समाजातील, आर्थिक, दुर्बल घटकांना सुरक्षितता वाटेल, असे वातावरण असणे, हीच सामाजिक न्यायाची संकल्पना आहे. सामाजिक न्याय दोन प्रकारचे असतात. पहिला औपचारिक न्याय. दुसरा अनौपचारिक न्याय. पहिल्या औपचारिक न्यायात न्यायसंस्था, कायदेशीर तरतुदीनुसार दोषी व्यक्तीला शिक्षा केली जाते. अशा न्यायाचे स्वरूप कायदेशीर, गुन्हेगार शास्त्राशी संबंधित असते. दुसरा जो अनौपचारिक न्याय आहे, चांगल्या, वाईटाचा विचार, माणुसकीचा विचार यात असतो. कोणावर अन्याय होणार नाही, हा समतेचा विचार यात असतो. या व्यतिरिक्त एखाद्या समाजाला एखाद्या गोष्टीसंदर्भात योग्य न्याय मिळाला का? मिळतोय काय? अन्न, वस्त्र, निवारा, मतदान, आरोग्य, शिक्षण मिळतेय का? वंचितांना न्याय मिळतोय का? वंश, जात, धर्म, विचार करता सर्वांना संधी मिळते का? गरीब-निराधारांचा विचार करून त्यांना प्रवाहात बरोबर आणणे, हा संपूर्ण विचार सामाजिक न्याय या संकल्पनेतून मोडतो. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील तळागाळातल्या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले. ते रयतेचे राजे म्हणूनच ओळखले जातात. महाराजांनी पुनर्विवाह कायद्याला मान्यता दिली. कोणत्याही वर्गासाठी ते कोणतेही द्वेष मनात नव्हते. माणसाला माणूस समजण्यात येणार नाही, तोपर्यंत विकास होणार नाही, असे मत त्यांचे होते. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा शिष्यवृत्ती घेऊन परदेशात शिक्षणासाठी गेले होते, पण शिष्यवृत्ती संपल्यामुळे त्यांना परत यावे लागले. महाराजांना ही गोष्ट समजल्यावर ते स्वतः मुंबईत गेले आणि त्यांनी आंबेडकर यांना पुढील अभ्यास सुरू ठेवायला मदत केली. शोषित, मागासवर्गीयांना आंबेडकर यांच्या रूपात नेता मिळाल्याचे शाहू महाराजांनी जाहीर केले होते. राज्य शासनाच्या वतीने २६ जून हा त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिवस' म्हणून साजरा केला जातो. कानाकोपऱ्यातल्या महाराष्ट्राकडे बघितले तर काय चित्र आहे? अनेक पाडे, वस्त्या, समाज असा आहे, जो अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य व्यवस्था या मूलभूत गरजांपासून वंचित आहे. त्यांना योग्य तो न्याय मिळत नाही. मुलांना शिक्षण मिळू शकत नाही. आरोग्यव्यवस्था नाही. आदिवासींच्या समस्या, प्रश्न आहेत. हुंडाबळी, लैंगिक शोषण, बलात्कार हे स्त्रियांचे प्रश्न आहेत. बालकांच्या कुपोषणाचे प्रश्न आहेत. बालकामगारांची समस्या आहे. असंघटित कामगार, स्त्रिया यांना काम देत असतानाच मानवतेच्या भावनेतून दिले जाते का? अन्याय होत नाही ना? हा विचारही सामाजिक न्याय दिवस साजरा करताना महत्त्वाचा आहे. आजची परिस्थिती लक्षात घेता सामाजिक न्याय' हा दिवस साजरा करताना त्या दृष्टीने खरोखरच न्याय दिला जातोय का? हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांचे कार्य डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल होणे महत्त्वाचे आहे आणि तेच हा दिवस साजरा करण्याचे फलित ठरेल. महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्यायाच्या दृष्टीने व्यापक प्रयत्न सुरू केले आहेत. सामाजिक न्याय दिन हे त्याचे प्रतीक आहे.

# कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा बागुलबुवा

**भारतात सगळ्यात जास्त चर्चा चाललीय ती तिसऱ्या लाटेची. याबरोबरच अजून एक भीती सगळ्या भारतीयांमधे आहे ती म्हणजे तिसरी लाट लहान मुलांना अधिक घातक असेल का? कदाचित याचे उत्तर हो' असे असू शकते. कारण, भारतामधल्या अजून एकाही लहान मुलाला लस मिळाली नाही आणि २०२१ च्या शेवटापर्यंत ती त्यांना मिळेल याची शक्यताही धूसर आहे. कोरोनाची तिसरी लाट येईल का? हा प्रश्न भारतात आज सगळ्यात जास्त चर्चेत आहे. नक्की कोरोनाची तिसरी लाट येईल का? या प्रश्नाच्या उत्तराआधी आपल्याकडे पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत काय परिस्थिती होती याचा आढावा घेऊया.**



आज-काल

**डॉ.नानासाहेब थोरात**

पहिल्या आणि दुसऱ्या लाटेची गोष्ट

पहिली लाट साधारणपणे एप्रिल २०२० मधे सुरू झाली आणि तिचं टोक १७ सप्टेंबर २०२० ला आलं. त्यादिवशी सर्वाधिक ९६ हजार कोरोना पेशंट आढळले आणि ११७० मृत्यूंची नोंद झाली. साधारणपणे ऑक्टोबर २०२० पासून ही नवीन संसर्गित कोरोना पेशंटची संख्या कमी होत गेली. यालाच लाट ओसरायला सुरवात झाली, असं म्हटलं गेलं. फेब्रुवारी २०२१ पर्यंत कोरोना रुग्णसंख्या दरदिवशी ९ हजारापर्यंत खाली आली. पण पुन्हा मार्च २०२१ पासून कोरोना रुग्णसंख्या वेगाने वाढायला सुरवात झाली आणि ६ मे २०२१ ला आजपर्यंतची सर्वाधिक कोरोना पेशंटची संख्या ४ लाख १४ हजार नोंदवली गेली. तर सर्वाधिक मृत्यूची संख्या सुमारे ४५५५ १८ मेला नोंदवली गेली. तेव्हापासून आजच्या दिवसापर्यंत कोरोना रुग्णसंख्या वेगाने कमी होत चाललीय. पहिल्या लाटेत अंदाजे १ कोटी कोरोना रुग्णसंख्या नोंदवली गेली. तर १ लाख २५ हजार मृत्यू नोंदवले गेले. दुसऱ्या लाटेचा आजपर्यंतचा विचार केला तर १.९० कोटी कोरोना रुग्णसंख्या नोंदवली गेली तर २ लाख ३५ हजार एवढ्या मृतांची नोंद झाली. दुसऱ्या लाटेत सलग ६४ दिवस १ लाखापेक्षा अधिक कोरोना रुग्णसंख्या दिसून येते. अशा स्थितीत जेव्हा सरासरी दररोजची कोरोना रुग्णसंख्या ५ हजारपर्यंत खाली येईल तेव्हाच खऱ्या अर्थाने दुसरी लाट संपली, असं म्हणता येईल.

ब्राझीलची अपवादात्मक परिस्थिती

जगातल्या इतर देशांना म्हणजे मुखत्वेकरून अमेरिका, युरोपातले देश, ब्राझील, तुर्की, दक्षिण आफ्रिका आणि मेक्सिको इथं कोरोना वायरसचा सर्वाधिक फटका बसलाय. त्यामुळे या दोन लाटांदरम्यान इथं नेमकं काय घडलं ते पाहूया. या सगळ्याच देशांत भारतसारखीच परिस्थिती पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत होती.

याला अपवाद ब्राझीलचा आहे. ब्राझीलमधे पहिली किंवा दुसरी लाट असं काही झालं नाही. तो देश अजूनही पहिल्या लाटेतच आहे. ती लाट अद्यापही ओसरलेली नाही. जुलै २०२० पासून तिथली रोजची कोरोना रुग्णसंख्या फारशी बदललेली नाही. पण मृत्यूचं प्रमाण जानेवारी २०२१पासून वाढतच आहे. युरोपमधल्या पोलंड या देशाची परिस्थिती एकदमच वेगळी झाली. सुरुवातीचे ६ महिने अगदीच नगण्य रुग्णसंख्या आणि मृत्यूचं प्रमाण कमी होतं. पण ऑक्टोबर २०२०पासून परिस्थिती एकदमच बदलली. एप्रिल २०२१पर्यंत तिथं मृत्यूचं थैमान सुरू होतं. असे काही अपवाद वगळता जगभरात सगळीकडे सारखीच परिस्थिती दिसते. साधारणपणे पहिल्या लाटेत अर्थव्यवस्थेचं नुकसान खूप झालं आणि दुसऱ्या लाटेत मनुष्यहानी खूप झाली. जगभरातल्या अनेक देशांत हीच परिस्थिती राहिली.

तिसऱ्या लाटेची चाहूल

जगातल्या इतर देशांचा विचार करता त्यांच्याकडे दुसरी लाट भारताच्या आधी आली आणि आधी ती कमी झाली. युरोपियन देशांचा विचार करता तिथं जी परिस्थिती असते त्यासारखीच परिस्थिती ४५ ते ५० दिवसानंतर भारतात निर्माण होते. पहिल्या आणि दुसऱ्या लाटेच्या वेळी हाच पॅटर्न दिसून आलाय.

सध्या अमेरिका आणि युरोपच्या परिस्थितीचा विचार केला तर दुसरी लाट ओसरून परिस्थिती साधारण होत चाललीय. इंग्लंडमधे मात्र तिसऱ्या लाटेची चाहूल दिसू लागलीय. गेले दोन महिने नव्या कोरोना रुग्णांची संख्या स्थिर असताना अचानक गेल्या दोन आठवड्यांपासून त्यात ५० ते ६० टक्क्यांनी वाढ दिसून आलीय. यामागे कोरोना वायरसचा डेल्टा' हा नवा वेरियंट कारणीभूत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येतंय. तसंच संपूर्ण इंग्लंडमधे कोरोना रुग्णसंख्या वाढत नसून काही भागामधेच तिची वाढ मर्यादित दिसून येतेय. काही दिवसांपूर्वी फ्रान्समधे पण तिसरी लाट सुरू होईल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. पण सध्या तिथली रोजची रुग्णसंख्या कमी होतेय. अमेरिकेत सध्या तरी तिसऱ्या लाटेची कोणतीही चाहूल दिसत नाही. यामागे अमेरिकेत तरुणांचं वेगानं झालेलं लसीकरण कारणीभूत आहे.

लसीकरणाचा पर्याय

कोरोना वायरसच्या पहिल्या दोन्ही लाटा सुरू होताना जगापुढे लॉकडाऊन हा एकच पर्याय होता आणि बहुतांश देशांनी तोच पर्याय स्वीकारला. जानेवारी २०२१ मधे मात्र लसीकरणाचा अजून एक पर्याय मिळाला. यामधे अमेरिका, इस्रायल आणि इंग्लंड या देशांनी आघाडी घेतली. या जोडीने माध्यमांत कोणतीही वाच्यता न करता दररोज २ कोटी लोकांना लस देऊन चीननेही यामधे आघाडी घेतलीय. ज्या देशांनी लसीकरण वेगानं केलंय त्या देशांतली रुग्णसंख्या आणि मृत्यूदर कमी झालाय. इंग्लंडमधे २० वर्षांवरील ७५ टक्के लोकांना लसीचा पहिला आणि ४५ टक्के लोकांना लसीचे दोन्ही डोस मिळूनसुद्धा तिथली रुग्णसंख्या वाढू लागलीय. पण मृत्यूदर कमी होतंय किंवा काही दिवसांपूर्वी शून्य मृत्यू नोंदवला गेलाय. याचा सरळ अर्थ असा होतो की लसींमुळे कोरोनाचा प्रसार कमी होत असला तरी तो पूर्ण थांबवता येत नाही मात्र कोरोना रुग्णांचा मृत्यू रोखता येतोय. तरीही इंग्लंडमधे डिसेंबर २०२१ पर्यंत लसीचा तिसरा डोस देण्याचेही नियोजन चालू आहे. साधारण अशीच परिस्थिती अमेरिकेतही असून युरोप-अमेरिकेत हॉस्पिटलमधे दाखल होणाऱ्या कोरोना पेशंटमधे ९९ टक्के असे रुग्ण आहेत ज्यांनी लस घेतलेली नाही. भारतामधील काही मेडिकल रिपोर्टचा अभ्यास केला तर अशीच परिस्थिती दिसून येतेय.

नव्या वेरियंटचा परिणाम

जगातल्या ज्या देशांनी वेगाने लसीकरण केलंय त्यांच्या सध्याच्या परिस्थितीवरून असं दिसून येतंय की, लसीच्या एका किंवा दोन डोसमुळे तिसरी लाट रोखता आली नाही तरी तिची तीव्रता कितीतरी पटीने कमी करता येते. भारत, ब्राझील, मेक्सिको, तुर्की आणि दक्षिण आफ्रिका या देशांतल्या आरोग्यव्यवस्था आणि लसीकरण यांची परिस्थिती एकसारखीच आहे. त्यामुळे या देशांमधे दुसरी लाट कमी होण्यामागे लॉकडाऊन हेच कारण आहे. तर युरोपातले काही देश आणि अमेरिकेत दुसरी लाट कमी होण्याला लसीकरण कारणीभूत ठरताना दिसते. या देशांमधे तिसरी लाट येईल का हे सर्वस्वी ज्या देशांमधे लसीकरण झालं नाही त्या देशांवर अवलंबून असेल. उदाहरणच द्यायचं झालं तर भारतामधे दुसरी लाट येण्यासाठी जो कोरोना वायरसचा स्ट्रेन कारणीभूत होता त्याच्यामुळेच इंग्लंडमधे तिसरी लाट येताना दिसतेय. कारण या स्ट्रेनवर लसीसुद्धा कमी प्रमाणात प्रभावी ठरतंय. अशीच परिस्थिती भारतात निर्माण झाली तर कदाचित इतर देशांच्या मानाने भारतामधली तिसरी लाट लवकर येईल किंवा दुसरी लाट न संपता पुन्हा पेशंटची संख्या वाढून तिसरी लाट सुरू होईल. भारताचं आजचं लसीकरण पाहिलं तर फक्त ५ टक्क्यांच्या आसपास लोकांना दोन्ही डोस मिळालेत. तर ज्यांनी दुसऱ्या लाटेवर नियंत्रण मिळवलंय त्यांची सरासरी ३० टक्क्यांच्या आसपास आहे.

नव्या योजनांची गरज

याबरोबरच अजून एक भीती सगळ्या भारतीयांमधे आहे ती म्हणजे तिसरी लाट लहान मुलांना अधिक घातक असेल का? कदाचित याचं उत्तर हो' असं असू शकतं. कारण, भारतामधल्या अजून एकाही लहान मुलाला लस मिळाली नाही आणि २०२१ च्या शेवटापर्यंत ती त्यांना मिळेल याची शक्यताही धूसर आहे. याचबरोबर जर एखादा कोरोनाचा नवीन स्ट्रेन आला आणि तो लस दिलेल्या लोकांनाही वेगाने संसर्गित करत असेल तर तो लहान मुलांना पण नक्कीच वेगाने संसर्गित करेल. तिसरी लाट थांबवण्यासाठी लसीकरण हाच खात्रीशीर उपाय होता. पण तो आपण अमलात आणू शकलो नाही आणि पुढच्या एक-दोन महिन्यांत ७० टक्के भारतीयांना किमान एक तरी डोस मिळेल याची शक्यता नाही. त्यामुळे तिसऱ्या लाटेची तीव्रता कमी ठेवण्यासाठी नवीन योजना राबवाव्या लागतील. महत्त्वाचं म्हणजे ज्या लोकांनी लस घेतलीय त्यांनी जास्तच खबरदारी घेतली पाहिजे. कोरोना पेशंटच्या मृत्यूचा विचार केला तर फक्त २० ते २५ टक्के असे लोक आहेत ज्यांचा मृत्यू फक्त कोरोनामुळे झालाय तर ८० टक्के लोकांना कॅन्सर, मधुमेह यांसारखे गंभीर आजार होते. त्यामुळे या लोकांच्या लसीकरणाला प्राधान्य देऊन त्यांना सुरक्षित ठेवणं महत्त्वाचं आहे. यामुळे तिसऱ्या लाटेत आपण मृत्यू दर कमीत कमी ठेऊ शकतो. याचं प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे इंग्लंड आणि जर्मनी हे आहेत. याचबरोबर लहान मुलांना इतर पर्यायी लसी देऊन त्यांची प्रतिकारशक्ती अजून चांगली करू शकतो. याचबरोबर पुढील एक वर्ष तरी मोठ्या गर्दीचे कार्यक्रम टाळणं फारच गरजेचं आहे. कारण वायरसच्या नवीन स्ट्रेनचे उगमस्थान असे कार्यक्रमच असतात.

(लेखक ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी, इंग्लंड इथे मेडिकल सायन्स डिविजनमधे मेरी क्युरी वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत.)

# आषाढी वारीवर कोरोनाचे सावट



संस्कृती

**संतोष मुळी**

कोरोना महामारीचे संभाव्य संकट लक्षात घेऊन राज्य शासनाने येत्या आषाढी एकादशीला मानाच्या दहा पालख्यांनाच वाखरी ते पंढरपूर दरम्यान प्रातिनिधिक पायी वारीसाठी अनुमती दिली, असे जाहीर करण्यात आले आहे, गतवर्षी आषाढी वारी झाली नाही, यंदाही कोरोना संकटाचा धोका लक्षात घेऊनच शासनाकडून कोरोना संकट लक्षात घेऊन सर्वासाठी पायी वारी थांबवण्यात आली आहे, यामुळे भाविकांमध्ये तीव्र नाराजीचा सुरू आहे, त्याचेच काही राजकीय मंडळी सोयीचे राजकारण करत आहेत, देहू-आळंदी ते पंढरपूर पायी वारी हा विलोभनीय विठ्ठल दर्शनवारी सोहळा असतो, पायी वारी शिस्त हे संपूर्ण जगाचे आकर्षण असते. हा पालखी सोहळा म्हणजे तेराव्या शतका पासूनची सांस्कृतिक व सामाजिक मूल्याची देणगी आहे, विविध जाती-धर्माचे लोक जात, धर्म विसरून अत्यंत एकोप्याने केवळ 'ज्ञानोबा-तुकाराम माऊली माऊली' करत विठ्ठलाचा गजर पायी वारी सोहळा असतो, सारा समाज भक्तीरसात न्हाहून दंग होतो, समाजातील समता, एकता, बंधुता आणि ओतप्रोत भरलेले चैतन्य याची संपूर्ण शिस्तबध्द वारीचे दर्शन जगभर दिसते, नेमके या ऐतिहासिक सोहळ्यावर गेल्या वर्षापासून कोरोनाचे सावट असल्याने माऊली मंडळीस थांबावे लागत आहे, आज कोरोना महामारीमुळे सारे जग त्रस्त आहे, आपल्या देशात दुसरी लाटेने हाहाःकार माजवला, या पंधरा दिवसात कोरोना आटोक्यात वाटत आहे, आता पुढील महामारी टाळण्यासाठीस १) लसीकरण २)संसर्ग नको यासाठी गर्दी टाळणे याची कठोर अंमलबजावणी सर्वांनी करणे रास्त आहे, आमची अनेक वर्षाची पायी वारी परंपरा असे सांगत महामारीकडे दुर्लक्ष करणे धोकादायक आहे, थोर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांनी १२५ वर्षापूर्वी परखडरित्या सांगितले होते, ते म्हणतात, केवळ पूर्वजांच्या रूढी व परंपरांना कवटाळणे योग्य नाही, ढुंगणाला गळू व्हायची वेळ आली तरी आमच्या पूर्वजांनी रूढी व परंपरा पाळल्या आम्ही त्या पाळणारच, असे करणे मूर्खपणाचे ठरते, परिस्थितीनुसार बदल गरजेचा आहे, आज कही मंडळी पायी वारीच्यासाठी सांगतात, मॉल आणि बाजारपेठ उघडण्यास परवानगी दिली जाते, मात्र 'मंदिरे' बंद ठेवली जातात, हा गैरवाद आहे, बाजारपेठ मधील गर्दी आणि वारीमध्ये गावागावातील गर्दी याची तुलना कशी करणार, आरोग्यादृष्टीने वारीचा इतिहास लक्षात घेतला तर प्रसंगानुसार, यापूर्वी वारीमध्ये, कॉलरा, टाईफाईड याचे लसीकरण केले जाते, आता कोरोना महामारीचे मोठं सावट आहे, यासाठी गर्दी टाळणे हाच उपाय रास्त आहे, कुंभमेळा करून झालेल्या गर्दीमुळे, विधानसभा निवडणुका प्रचारसभेतील झालेल्या गर्दीमुळे कोरोना आपण अंगावर ओढून घेतला हजारो जणांचा बळी गेलेला आहे, मग केवळ परंपरेच्या हट्टापायी पायी वारीसाठी लाखोंची गर्दी जमविणे धोकादायक ठरणारच, मग कोरोना 'महामारीस' पायी वारी आमंत्रण ठरणार यासाठी शासकीय नियमावली काटेकोर पाळणे हे जनतेचे कर्तव्य ठरते.

पंढरीची वारी एक दृष्टिक्षेप

पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील लोकांचा अप्रतिम सांस्कृतिक सोहळा आहे, आषाढी एकादशीला वारकरी माऊली दिंडीच्या रूपाने प्रत्यक्ष विठ्ठल-रूक्मिणीच्या चरणी एकरूप होतात, आपल्या आयुष्याचे सार्थक झाले, अशी भावना लाखो भाविकांच्या मनांत असणार क्षण, पंढरीची वारी एक हजार वर्षापूर्वीपासून सूरू झाली, वारीची परंपरा ही संत ज्ञानेश्वरा पूर्वीपासून होती, त्यांचे वडील विठ्ठलपंत हे पंढरीचे वारकरी होते, नामदेवरायापासून दिंडीची परंपरा सुरू झाली, असे सांगण्यात येते, संत ज्ञानदेवांच्या समाधी सोहळ्यास ऊपस्थित राहण्यासाठी, संत नामदेवांच्या नेतृत्वाखाली संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार आदी संत मंडळीनी भजनाची दिंडी तयार केली, स्वतः संत नामदेवराय दिंडीचे विणेकरी झाले, ही पहिली दिंडी संतांच्या गांवावरून पंढरपूरला विठ्ठलाच्या गांवी जाण्याऐवजी विठ्ठलाच्या पंढरपूर मधून संताच्या आळंदीकडे नेण्यात आली, तेव्हा पासून कार्तिक एकादशीला नामदेवाची दिंडी व पंढरीची वारी आळंदीस येण्याची परंपरा सुरू झाली, पंढरीच्या वारीची परंपरा संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या घरात पूर्वीपासून होती, वारी परंपरा त्याच्या घराण्यातील मूळ पुरूष विश्वंभरबाबा यांनी सुरू केली, संत तुकोबाचे वडील बोल्होबा, संत तुकोबाराय, त्याचे पुत्र नारायण महाराज मानी पुढे वारी परंपरा समर्थपणे सुरू ठेवली, नारायण महाराजांनी ज्ञानोबा आणि तुकोबाराय यांच्या पादुका पालखीत ठेवून ज्ञानोबा-तुकोबा असा भजन सोहळा करत दिंडी वारी मोठी करत पंढरीस आषाढी एकादशीला दिंडी सोहळा सुरू केल्याची परंपरा आहे, या पुढे महाराष्ट्रातील प्रमुख गावातील परिसरातील संताच्या नांवे दिंडी सुरू करण्यात आल्या, संताच्या चांदीच्या पादुका प्रतीके म्हणून पालखीत ठेवण्यात आल्या, आषाढी वारीस पंढरीला वेगवेगळ्या ठिकाणाहून या संताच्या पालख्या येण्याची परंपरा सुरू आहे, समतेची पताका खांद्यावर घेत, वारीच्या माध्यमातून एकात्मतेचा संदेश तर दिंडीतून बंधूता असा सुंदर अविष्काराचा संगम सारे जग आषाढी एकादशी सोहळा प्रसंगी दरवर्षी अनुभवत असते, दिंड्याच्या या प्रस्थान सोहळ्यासाठी, आळंदीतून ४३० तर देहूमधून ३३० दिंड्याचे प्रस्थान आज परंपरेनुसार होत असते, गतवर्षीपासून 'कोरोना'चे काळे सावट आले, सर्वाच्या आरोग्यमयतेसाठी नियमावली लक्षात घेऊनच पंढरीची वारी आपण आहे. तेथूनच विठ्ठल नामाचा गजर करत या वर्षी एकरूप होण्याचे ठरवू या. जय हरी विठ्ठल!

(लेखक माजलगावस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

# गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक

## नवनियुक्त शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांचा संकल्प





### ‘रक्ताचे पाणी आणि हाडाचे काडं करून संघटन वाढवणार’



शिवसेना बीड जिल्हाप्रमुख म्हणून सूत्रे हाती घेतल्यानंतर बोलताना अप्पासाहेब जाधव म्हणाले, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी मोठ्या विश्वासाने माझ्यावर जबाबदारी सोपविली आहे. त्या विश्वासाला कदापीही तडा जाऊ देणार नाही. अशी ग्वाही देतानाच जीवाचे रान करून संघटनात्मक बांधणीवर भर देणार आहे. गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक ही संकल्पना जिल्ह्यात राबवताना रक्ताचे पाणी आणि हाडाचे काडं झाले तरी मागे हटणार नाही, असा विश्वासही उपस्थित शिवसैनिकांना अप्पासाहेब जाधव यांनी दिला.

▶ प्रतिनिधी

माजलगाव : गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक निर्माण करणार असा दृढ संकल्प नवनियुक्त शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब कडाजीराव जाधव यांनी व्यक्त केला. ते जिल्हाप्रमुख पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर वर्तमानशी बोलत होते.

शिवसेनेचे नवनियुक्त बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब कडाजीराव जाधव मुंबईहून माजलगाव शहरात दाखल होताच त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. दरम्यान, छत्रपती संभाजी महाराज चौक ते जाधव यांच्या देवकृपा निवासस्थानापर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीला शिवसैनिकांकडून तुफान प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशान्वये बीडचे नवे जिल्हाप्रमुख म्हणून अप्पासाहेब कडाजीराव जाधव यांची मंगळवारी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीनंतर मुंबईहून जाधव हे माजलगाव शहरात गुरूवारी दाखल होताच सर्वत्र त्यांचे जल्लोषात स्वागत झाली. विविध ठिकाणी फटाक्यांच्या आतषबाजीत आणि पेढे वाटून अप्पासाहेब जाधव यांच्या निवडीचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. माजलगाव, वडवणी, धारूर, परळी, केज, अंबाजोगाई तालुक्यांमधून ज्येष्ठ शिवसैनिक आणि तरूण शिवसैनिकांनी रॅलीत हजेरी लावली. माजलगाव शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकातून रॅलीला प्रारंभ झाला. पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून जाधव यांच्या देवकृपा निवासस्थानी रॅलीचे विसर्जन करण्यात आले. रॅलीत शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

---

### वटपौर्णिमा उत्साहात साजरी



माजलगाव : वटसावित्री पौर्णिमेनिमित्त वडाचे पूजन सुवासिनी दिसत आहेत.

---

## ‘मार्तंड’चा विद्यार्थ्यांना मदतीचा हात

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे शनिवारी वाटप करण्यात आले.



माजलगाव शहरातील बायपास रोड लगत असलेल्या साई बाबा मंदिरात विद्यार्थ्यांना मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने विविध शालेय साहित्याचे वाटप केले. याप्रसंगी बोलताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल देवकते म्हणाले, समाजाचे आपण काहीतरी देणेकरी लागतो, या भावनेतून गोरगरीबांना सहाय्य करणे मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे ध्येय आहे. समाजातील शेवटच्या घटकांना मदतीचा हात पोहोचला पाहीजे त्यासाठी संस्थेचे पदाधिकारी धडपड करत आहेत.

या कार्यक्रमाला अध्यक्ष विशाल बालासाहेब देवकते यांच्यासह सचिव सौ.संगिता विशाल देवकते, शिवकन्या चोरमले, महेश देवकते, सौ.मनिषा विजय देवकते, सौ.ज्योती मंगलनाथ देशमाने, मधुकर तसनुसे, संजय कारळकर, तुकाराम देशमाने, दिपक काजळे, दिग्विजय सोळंके, गोविंदा मस्के आदींची उपस्थिती होती.

---

### ’वर्तमान’चे सकारात्मक वार्ताकन



माजलगाव : वर्तमान नेहमीच विकासात्मक पत्रकारितेला प्राधान्य देत आहे. माजलगाव किराणा असोसिएशनने केलेल्या कार्याचे वार्ताकन करणाऱ्या कात्रणाची फ्रेम किराणा असोसिएशनचे अध्यक्ष संजय सोळंके आणि तुषार भुतडा यांना प्रदान करताना वर्तमान माध्यम समूहाचे संपादक भगीरथ तोडकरी.

---

# ...तर मराठा समाजाला शैक्षणिक सवलती द्या

## खासदार डॉ.प्रितम मुंडे यांची आग्रही मागणी

▶ प्रतिनिधी



अंबाजोगाई : धनगर समाजाला ज्याप्रमाणे राजकीय आरक्षणाव्यतिरिक्त एसटी प्रवर्गाच्या सर्व सवलती मिळतात, त्याचप्रमाणे आरक्षणाची मागणी पूर्ण होईपर्यत मराठा समाजाला शैक्षणिक आरक्षणाच्या सर्व सवलती मिळाव्यात, अशी आपली भूमिका असल्याचे खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी नमूद केले. अंबाजोगाई येथे एका कार्यक्रमास आल्या असता त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

### ओबीसी समाजाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण हवे

’ओबोसी’चा लढा राजकीय आरक्षण पूर्ववत मिळावे यासाठी आहे, तर मराठा समाजाचा लढा शैक्षणिक आणि नौकरीतील आरक्षणाच्या मागणीसाठी आहे. दोन्ही मागण्या भिन्न आहेत आणि या दोन्हीलाही आमचा सर्व ताकदीनिशी पाठिंबा आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे ही आमची भूमिका आहे.

खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीला पूर्ण समर्थन असून, आरक्षण निश्चितच मिळायला हवे अशी भूमिका मांडली. जेव्हा मराठा आरक्षण आंदोलनाची सुरूवात झाली त्यावेळी लोकसभेत सर्वप्रथम हा मुद्दा मांडणारी मी महाराष्ट्रातील पहिली खासदार होते. आतापर्यत तीन वेळा मी मराठा आरक्षणासाठी लोकसभेत बोलले आहे. यापुढेही मराठा समाजाच्या लढ्यात आमचे पूर्ण योगदान राहील. धनगर समाजाला राजकीय आरक्षणाव्यतिरिक्त एसटी प्रवर्गाच्या सर्व सवलती मिळतात. त्याचप्रमाणे आरक्षण जेव्हा मिळायचे ते मिळेल; परंतु मराठा समाजाला शैक्षणिक आरक्षणाच्या सवलती ताबडतोड देण्यात याव्यात, अशी आमची भूमिका असल्याचे खासदार मुंडे यांनी स्पष्ट केले.

---



माजलगाव : येथे ओबीसी आरक्षणाच्या मागणीसाठी केलेल्या रास्ता रोकोप्रसंगी रमेश आडसकर.

# माजलगाव भाजपात गटबाजीचे प्रदर्शन

## ओबीसी आरक्षणासाठी चक्का जाम:आडसकर, जगतापांची स्वतंत्र आंदोलने

▶ प्रतिनिधी

माजलगाव : ओबीसी आरक्षण व इतर विविध मागण्यांसाठी भाजपच्या वतीने माजलगाव येथे शनिवारी रास्ता रोको करण्यात आला. आंदोलनादरम्यान, भाजपमध्ये गटबाजी दिसून आली. भाजपचे रमेश आडसकर यांनी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे नेतृत्व केले, तर मोहन जगताप व नितीन नाईकनवरे यांनी स्वतंत्रपणे आंदोलन केले. यावरून माजलगाव तालुक्यातील भाजपात उघड गटबाजी दिसून आली.

ओबीसींच्या मागण्यांसाठी भाजपच्या वतीने राज्यभर आंदोलन केले जात आहे. या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करण्यात आले. एका गटाचे नेतृत्व रमेश आडसकरांनी केले, मोहन जगताप, नितीन नाईकनवरे गटाने आपला स्वतंत्र सवतासुभा रस्त्यावर उभा केला. शनिवारी ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द झाल्याच्या निषेधार्थ भाजपच्या वतीने शहरात रास्ता रोको करण्यात आला. यावेळी रमेश आडसकर यांनी सिंदफणा पुलावर रास्ता रोको केला, तर छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप, नितीन नाईकनवरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको केला. दोन ठिकाणी आंदोलने झाल्याने भाजपची दुफळी चव्हाट्यावर आली. रमेश आडसकर यांच्यासोबत भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राऊत, शहराध्यक्ष अॅड.सुरेश दळवे, ज्ञानेश्वर मेंडके, रमेश पवार, डॉ.भगवान सरवदे, अजय शिंदे आदींसह भाजपचे सर्व पदाधिकारी, शाखाप्रमुख, बुथप्रमुख यांच्यासह भाजपचे असंख्य कार्यकर्ते दिसून आले, तर मोहन जगताप, नितीन नाईकनवरे संतोष यादव, श्रीकृष्ण सोळंके, नगरसेवक शरद यादव, ईश्वर होके, विष्णुपंत खेत्री, जगदिश बादाडे, सरपंच उध्दव ताकट, सरपंच अविनाश गोंडे, सरपंच भालचंद्र सोळंके, सरपंच जयराम गायकवाड, शिवप्रसाद खेत्री, दिगंबर थावरे, विलास बडे, अशोक डोणे, विलास नेमाने, बंडू नाईकवाडे, रामदास तिडके, अतुल चव्हाण, बालासाहेब दांगट, हनुमान काळे, भाऊसाहेब गोळेकर, हितेंद्र काळे, त्र्यंबक सिरसट यांच्यासह आंदोलनात त्यांचा कायमस्वरूपी असणारा मित्रमंडळाचा सवतासुभा मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरला. दरम्यान, आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेऊन सोडून दिले.



माजलगाव : चक्काजाम आंदोलन करतांना मोहन जगताप, नितीन नाईकवरे व कार्यकर्ते.

---

# शेतकऱ्यांची अडवणूक खपवून घेणार नाही

## शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांचा इशारा

▶ प्रतिनिधी



माजलगाव : मृग नक्षत्राच्या सुरवातीला झालेल्या पावसावर अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या केल्यामुळे त्यांचे भांडवल संपले आहे. सध्या पावसाने दडी मारल्यामुळे त्याच शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आलीय. अशा परस्थितीत अनेक कृषी दुकानदारांनी बियाणांची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करत चढ्या भावाने विक्री करीत आहेत. शेतकऱ्यांची अशाप्रकारची अडवणूक शिवसेना कदापि खपवून घेणार नाही. असे प्रकार होत असल्यास शेतकऱ्यांनी तत्काळ शिवसेनेशी संपर्क करण्याचे आवाहन शिवसेनेचे नवनियुक्त जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी केले आहे.

### ‘बियाण्यांची चढ्या भावाने विक्री केल्यास गय नाही’

एकीकडे कृषी दुकानातून चढ्या भावात बियाणांची विक्री होत असताना त्यांच्यावर अंकुश ठेवणारे कृषी अधिकारी, कर्मचारी मात्र मुग गिळून गप्प आहेत. असे प्रकार करणाऱ्या विक्रत्यावर कारवाई न झाल्यास शिवसेना एकाही कृषी अधिकाऱ्यांना सोडणार नाही असा इशाराही शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी दिला आहे.

यावर्षी समाधानकारक पाउस होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने सुरवातीलाच वर्तविला होता. यातच मृग नक्षत्राच्या सुरवातीला झालेल्या दमदार पावसावर बहुतांशी शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरण्या उरकल्या आहेत. कापूस, सोयाबीन, मुग, उडीद यासारख्या पिकाच्या पेरण्या झाल्यानंतर पावसाने मागील पंधरा दिवसापासून अचानक दडी मारली आहे. यामुळे उगवलेले धान सुकून जात असून अनेक शेतकऱ्यांचे पेरलेले बियाणे उगवलेच नाही.

शेतकऱ्यांजवळ असलेला सर्व पैसा पेरणीचे बियाणे, खते खरेदी करण्यात संपून गेला आहे. पावसाच्या दडीमुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याचे वेळ निर्माण झाली आहे. यासाठी शेतकऱ्यांना पुन्हा बियाणे खरेदी करण्याची वेळी आली असताना बाजारात अनेक कृषी दुकानदारांनी सोयाबीन, मुग, उडीद यासारख्या बियाणांची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण केली आहे. बियाणाचा तुटवडा भासवून हेच कृषी दुकानदार मागच्या दराने तेच बियाणे चढ्या भावात विक्री करीत असल्याच्या अनेक तक्रारी शेतकऱ्यांतून येत आहे.

अगोदरच पहिल्या पेरणीत आर्थिक बजेट संपलेल्या शेतकऱ्यांची कृषी दुकानदारांकडून होत असलेली पिळवणूक शिवसेना कदापीही खपवून घेणार नाही. बाजारात चढ्या भावाने बियाणांची विक्री होत असल्यास शेतकऱ्यांनी तत्काळ माझ्याशी किंवा शिवसेनेच्या कोणत्याही सैनिकाशी संपर्क सधवा. आमचे शिवसैनिक कृषी अधिकाऱ्यांना सोबत घेत त्या दुकानदाराच्या दुकानात घुसून साठेबाजी केलेल्या बियाणाची रास्त भावात शेतकऱ्यांना विक्री करतील. असे आवाहन शिवसेनेचे नवनियुक्त जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी केले आहे.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

### टिसी हरवला आहे

मच्छिंद्र भिमराव ससाने राहणार किट्टी आडगाव ता. माजलगाव जि. बीड यांचा किट्टी आडगाव ते माजलगाव प्रवासादरम्यान दहावी पासचा टिसी हरवला आहे. तरी कोणाला सापडल्यास संपर्क करा साधा.

संपर्क : ९५२७५२५३८७

### टिसी हरवला आहे

ज्ञानेश्वर परमेश्वर शिंदे रा.मनुरवाडी माजलगाव, जि.बीड यांचा मनुरवाडी माजलगाव प्रवासादरम्यान दहावी पासचा टिसी हरवला आहे. तरी कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क : ९९२१०२३८३८




आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.